सकाळ TODAY ★

शनिवार, १८ मे २०२४ पुणे SakalNews SakalMediaNews www.esakal.com

# सिटी इंटरनॅशनलचा १०० टक्के निकाल

**कात्रज, ता. १७ :** सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या निकालात सिटी इंटरनॅशनल स्कूल शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांत पालवी कश्यप आणि सिया गादिया यांनी ९६.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

ईशान महाबळेश्वरकर ९५.४ टक्के याने दुसरा, यश गाडेकर आणि यश्वी जैन ९४.८ टक्के घेत तिसरा, तर अनुज चांडक याने ९३.४ टक्के आणि युवराज बदाडे ९२.६ टक्के मिळवत अनुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक मिळविला. एकूण विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. शाळेचे अध्यक्ष मौलिक एन. दीक्षित, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.